| MHAK070013742023 | **<u>फौ.कि.अर्ज क्र. २६२/२०२३ मधील निशाणी ६ वरील आदेश</u>**<br>किरण वानखडे वि. प्रफुल्ल वानखडे<br>(दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५) |
|---|---|

प्रस्तुत अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार क्र. १ ला दरमहा रु. ५,०००/- व अर्जदार क्र. २ ला शिक्षणाकरीता अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

२. अर्ज व त्यावरील गैरअर्जदाराचे म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

३. अर्जदाराचे थोडक्यात असे कथन आहे की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक १४ मे २०२० रोजी बौध्द रितीरिवाजाप्रमाणे पारस येथे झाले. लग्नामध्ये अर्जदाराचे वडीलांनी सोन्या, चांदीचे दागीने, गैरअर्जदार यांना लग्नाचेकपडे व लग्नाचा खर्च केला. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारकडे नांदण्यासाठी आल्यावर सुरुवातीचे दोन ते अडीच महिने चांगली वागणुक दिली. गैरअर्जदाराची आई व भाऊ त्याला भडकावित असल्यामुळे गैरअर्जदार अर्जदार क्र. १ हिला तिच्या आई वडीलांना हुंडा कमी दिला, तिच्या पेक्षा चांगली मुलगी भेटली असती, हुंडा ही जास्त मिळाला असता असे म्हणत होता. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिला घर बांधण्यासाठी तिच्या वडीलांकडुन रु. ५०,०००/- आणण्याची मागणी करीत होता व पैसे आणल्याशिवाय घरात यायचे नाही असे धमकावित होता. अर्जदार क्र. १ चे वडील पैसे देवु न शकल्यामुळे गैरअर्जदार अर्जदार क्र. १ चा शारिरीक व मानसिक छळ करीत होता. त्याकरिता गैरअर्जदार आई व भाऊ प्रवृत्त करीत होते. गैरअर्जदार अर्जदार क्र. १ हिला मारहाण करुन तिच्या वडीलांकडुन पैशाचा तगादा लावुन अर्जदार क्र. १ हिला माहेरी हाकलुन देत होते. गैरअर्जदाराने दिलेला त्रास असहय झाल्याने नाईलाजाने अर्जदार ही अर्जदार क्र. २ मुलासह सन २०२१ पासुन तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार ही मुलासह आईवडीलांच्या दयेवर जिवन जगत आहे. अर्जदार क्र. १ हिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला कुठलेही आर्थिक सहाय्य केले नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिला त्रास देण्याच्या उद्देशाने हाकलुन दिल्यामुळे नाईलाजाने ती मुलासह माहेरी राहत आहे.

४. गैरअर्जदार हे आठवडी बाजार, पारस येथे कायम स्वरुपी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत असुन त्यांना त्यापासुन दरमहा रु. ३०,०००/– उत्पन्न मिळते. गैरअर्जदारावर अर्जदारांशिवाय कोणाचीही जबाबदारी नाही. अर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार क्र. १ हिला दरमहा रु. ५,०००/– व अर्जदार क्र. २ ला शिक्षणाकरीता अंतरिम पोटगी मिळण्याचा आदेश व्हावा अशी विनंती केली.

५. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जावर नि. ८ अन्वये त्यांचे म्हणणे दिलेले असून अर्जदारासोबत लग्न झाल्याचे मान्य केले असुन अर्जातील इतर कथने अमान्य केलेली आहेत. गैरअर्जदारांनी त्यांच्या अधिकच्या कथनात म्हटले की, गैरअर्जदारने अर्जदार क्र. १ हिला सोन्या, चांदीचे दागीने करुन दिलेले असुन सर्व दागीने अर्जदार क्र. १ च्या ताब्यात आहेत. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारच्या एकत्रित कुटुंबात नांदायला आल्यावर फक्त १५ दिवसच चांगली नांदली. त्यानंतर तिने उशिरा उठणे, घरातील कामे न करणे आणि वेगळे राहण्याकरीता भांडण सुरु केले. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ ला त्यांच्या आईला बी.पी. चा आजार असुन तिला आपण एकटे सोडु शकत नाही असे सांगितले. परंतु अर्जदार क्र. १ ही वेगळे राहु नाहीतर माहेरी निघुन जाणार असे सांगत होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार व त्यांच्या आईला न सांगता ४ ते ५ वेळा माहेरी निघुन गेली आहे. अर्जदार क्र. १ च्या इच्छेनुसार गैरअर्जदार एकाच घरात वेगळे राहिले व भाडयाचे घर घेवुन वेगळे राहिले, परंतु तिच्या स्वभावात फरक पडला नाही. अर्जदार क्र. १ च्या वागणुकीमुळे गैरअर्जदारचे जीवन उध्वस्त झाले आहे. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार यांना खोटया केस मध्ये अडकविण्याच्या धमक्या दिल्या आहेत. सन २०२० मध्ये अर्जदार क्र. १ ही दिवाळी करीता माहेरी गेल्यावर १५ दिवसानंतरही परत न आल्यामुळे अर्जदार क्र. १ हिला नांदण्यासाठी घेवुन येण्याकरीता गैरअर्जदारचे जावई सत्यपाल अंभोरे यांना पाठविले असता त्यांना घरात न घेता घटस्फोटाची मागणी केली. म्हणुन गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला नांदण्यासाठी रजिस्टर पोस्टाने नोटिस पाठविली तरी ती नांदण्यास आली नाही. अर्जदाराचे मामा मामी तिला नांदण्यास पाठविण्यासाठी तयार होते, परंतु अर्जदारचा गैरअर्जदार यांना राहत्या घरात येत नाही वेगळी खोली करावी लागेल असा फोन आला. गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ हिला नांदविण्यास तयार आहेत.

६. अर्जदार ही गजानन कॉन्हेंट, पारस येथे शिक्षका म्हणुन कार्यरत असुन ती स्वतःचा व मुलाचा उदरनिर्वाह करु शकते. गैरअर्जदार सांभार विकण्याचे काम करीत असुन त्यापासुन त्यांना रु. ८०/– ते १००/– दररोज उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झालेले असुन त्यांना जड काम करता येत नाही. गैरअर्जदाराचे आईची जबाबदारी त्यांचेवर आहे. म्हणुन ते अर्जदार क्र. १ हिला पोटगी देण्यास असमर्थ आहेत.

७. अर्जदाराचा अर्ज व गैरअर्जदारचा लेखी जबाब तसेच दोन्ही पक्षांतर्फे वि.अधिवक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

८. सदर पार्श्वभुमीवर प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील प्रश्न विचारार्थ येतात. सदर प्रश्नांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| अ.नं. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| (१) | अर्जदार हे गैरअर्जदाराकडुन मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | .. | **अशंतः होकारार्थी.** |
| (२) | आदेश काय ? | .. | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ व २ करिता :–**

९. अर्जदाराच्या अर्जातील कथने, गैरअर्जदाराची कैफीयत व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

१०. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी आपआपले मालमत्ता आणि दायित्व प्रतिज्ञालेख अभिलेखावर सादर केलेले आहे. अर्जदार हिने विवाह नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे.

११. दोन्ही पक्षांच्या परस्पर विरोधी कथनावरुन या ठिकाणी अभिलेखावरील दस्तांचा विचार तरतुदीनुसार करावा लागेल. अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ अन्वये पोटगी मिळणेकरिता अर्ज सादर केला आहे. सदर तरतुदीनुसार

कायदेशीर पत्नी आणि अल्पवयीन मुले असल्यास व गैरअर्जदाराने त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नसल्यास तसेच ते स्वतःहाचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्यास आणि गैरअर्जदाराकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असल्यास, ते गैरअर्जदाराकडुन पोटगीची मागणी करु शकतात. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध मान्य केलेले आहे.

१२. अर्जदाराने गैरअर्जदाराकडे पुरेसे उत्पन्नाचे साधन असतांना देखील तिच्या व मुलाचा उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केली नसल्याचे व ती स्वतः उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराची शपथेवर असलेली कथने पाहता सकृतदर्शनी गैरअर्जदाराची अर्जदार यांना सांभाळण्याची नैतिक जबाबदारी आहे. गैरअर्जदाराचे असे म्हणणे नाही की, त्याने अर्जदार माहेरी गेल्यानंतर त्यांच्या पालन पोषणाची काही व्यवस्था केली. गैरअर्जदाराने अर्जदार यांना सांभाळण्यास दुर्लक्ष केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. अर्जदार कमवित असल्याबाबत गैरअर्जदाराने त्याच्या लेखी जबाबात अर्जदार ही कान्व्हेंटमध्ये शिक्षका असल्याचे आणि मालमत्ता व दायित्व शपथपत्रात अर्जदार ही खाजगी दवाखान्यात कामावर असल्याचे कथन केलेले आहे. गैरअर्जदाराच्या लेखी जबाबात आणि मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रात अर्जदाराचा व्यवसायाबद्दल परस्पर विरोधाभास असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार कमवित असल्याबाबत कोणतीही कागदपत्रे गैरअर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेली नाही. अशा परिस्थितीत अर्जदार स्वतःचे पालन पोषण करण्यास समर्थ आहे असा निष्कर्ष या घडीला काढता येणार नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदारच्या लेखी जबाबातील कथनाप्रमाणे तो सांभार विक्रीचा व्यवसाय करीत असुन दररोज रु. ८०/– ते १००/– कमवित असुन मासिक त्याला रु. ३०००/– चे उत्पन्न मिळत असेल असा अंदाज लावता येईल. गैरअर्जदारावर त्यांच्या आईची जबाबदारी आहे ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. गैरअर्जदाराने त्याच्या लेखी जबाबात त्याचे अपेंडिक्सचे ऑपरेशन झालेले असुन तो जड काम करु शकत नाही असे नमुद केलेले आहे. असे असले तरी गैरअर्जदार अर्जदारच्या पालनपोषणची जबाबदारी नाकारु शकत नाही. गैरअर्जदार चे वय पाहता, तो सदृढ व्यक्ती आहे असे दिसुन येते. गैरअर्जदार हा सदृढ व्यक्ती (able bodied person) म्हणुन मोलमजुरी किंवा इतर कोणतेही काम करुन

गैरअर्जदार प्रतिमाह रु. १०,०००/– ते १५,०००/– सहज कमवु शकतो. अर्जदार हिचा जिवनावश्यक तसेच वैद्यकीय खर्चासह दरमहा खर्च व गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाचा विचार करता व गैरअर्जदार यांच्यावरील कौटुंबिक जबाबदारी पाहता या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिला रु. १५००/– व अर्जदार क्र. २ यास रु. १०००/– अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन दरमहा एकुण रु. २,५००/– देणे योग्य राहील. अर्जदारांच्या पालन पोषणाची सर्व जबाबदारी गैरअर्जदारची आहे. अर्जदार क्र. २ करीता अर्जदार क्र. १ हिने शैक्षणिक खर्चाची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदार क्र. २ चे वय काय आहे व तो कोणत्या शाळेत, कोणत्या वर्गात शिकतो त्याबद्दल अर्जदार हिने अर्जात काही नमुद केले नाही. त्यामुळे या ठिकाणी अर्जदार क्र. २ चा शैक्षणिक खर्चाबाबत आदेश करणे संयुक्तिक होणार नाही. वरील सर्व परिस्थिती विचारात घेता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'अंशतः होकारार्थी' देऊन पुढील प्रमाणे आदेश करते.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारने मुळ अर्जाच्या दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत दरम्यानच्या कालावधीमध्ये अर्जदार क्र. १ हिला रु. १५००/– व अर्जदार क्र. २ यास रु. १०००/– असे दरमहा एकुण रु. २,५००/– (अक्षरी दोन हजार पाचशे फक्त) अंतरिम पोटगी दयावी.

३. सदर आदेशाची विनामुल्य प्रत अर्जदाराला देण्यात यावी.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.10.09 11:06:42 +0530

दिनांक : ०८/१०/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 08/10/2025 |
| Order signed by P.O on | :- | 08/10/2025 |
| Order uploaded on | :- | 09/10/2025 |